# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल**
**क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र. १२०३/२०२२/धुळे**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री.प्रविण मुरलीधर बोरसे, रा.मु.पो.कावठे, ता.साक्री, जि.धुळे. | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, भडगाव/टेंभ प्र.भामेर, ता.साक्री, जि.धुळे. | सहाय्यक गटविकास अधिकारी, पंचायत समिती, साक्री, ता.साक्री, जि.धुळे. |

**सुनावणी दिनांक – १६/०७/२०२४**

**१. उपस्थिती –**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | प्रतिनिधी उपस्थित | अनुपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज –**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : १४/०२/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : माहिती अधिकारात माहिती मागणी केली असता मी माहिती अवलोकन G.R. दाखवुन अवलोकन करुन मला आवश्यक असलेली माहिती मागणी केली असता. जन माहिती अधिकारी यांनी मान्य न करता पैसे भरल्यानंतर माहिती देण्यात येईल असे सांगून मला माहिती दिली नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : जन माहिती अधिकारी यांचेवर शिस्तभंगाची कार्यवाही का करु नये.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १५/०७/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २२/०७/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन-२००० ते आज पर्यंत.

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** मौजे भडगाव/टेम्बे प्र. भामेर या गावाचे सन-२००० ते आज पर्यंत १ ते ३१ रजिस्टर नोंद बुक झेरॉक्स मिळावी. सर्व अधिकारी यांनी आज पर्यंत ग्रामपंचायत भेटी सर्वांनी चौकशी केलेली अहवाल कामाची पाहनी सर्व योजनेतून कामे झालेले कामाचे इस्टिमेट आदेश मंजुरी, M.B. फोटो, बँक स्टेटमेंट इत्यादी ऑडीट प्रत. सर्व गोष्टीचा चौकशी करुन अहवाल व एक.एक.प्रत झेरॉक्स मिळावी.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, भडगाव/टेंभ प्र.भामेर, ता.साक्री, जि.धुळे. यांनी दि.०३/०८/२०२१ च्या पत्रान्वये शुल्क भरणेबाबत अपिलार्थी यांना कळविले आहे.

**४. प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २९/११/२०२१

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०६/१२/२०२१

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती मिळाली नाही.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :** अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपिल अर्जावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहा. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, साक्री, ता.साक्री, जि.धुळे. यांनी दि.०७/०१/२०२२ रोजी सुनावणी घेऊन अपिलकर्ता यांनी मागितलेली माहिती माहितीचे पैसे भरुन उपलब्ध करुन घ्यावी असे नमूद करुन प्रथम अपिल निकाली काढले आहे.

**५. युक्तिवाद/लेखी खुलासा –**

(१) **अपिलार्थी-** जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही.

(२) **विद्यमान प्रथम अपिल अधिकारी यांचे प्रतिनिधी-** अपिलार्थी यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याचे स्पष्ट केले आहे.

**६. निष्कर्ष –**

(१) अपिलार्थी यांनी माहिती अर्जात माहितीचा विशिष्ट दिनांक म्हणजे कोणत्या दिनांकापासुन माहिती हवी आहे ते नमूद केलेले नसल्याने माहिती अर्ज मोघम होत आहे.

(२) जन माहिती अधिकारी यांनी कळविल्यानुसार व प्रथम अपिल निर्णयाप्रमाणे अपिलार्थी यांनी माहिती शुल्क भरणा केलेला दिसून येत नाही. त्यामुळे माहिती न मिळण्यास अपिलार्थी स्वत: जबाबदार आहेत.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुतचे द्वितीय अपिल क्र.१२०३/२०२२/धुळे निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

**जावक क्र.** 2902 **दिनांक-** 24 MAR 2025